**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

प्रा.मोहन सुखदेव वेताळ
८४९, जोशीवाडी, मु.पो.ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरूर नगरपरिषद, घोडनदी, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर,
शिरूर नगरपरिषद, घोडनदी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** प्रा.मोहन सुखदेव वेताळ
८४९, जोशीवाडी, मु.पो.ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, जि.पुणे श्री.पी.एम.मसलेकर

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद,
घोडनदी, जि.पुणे श्री.आर.जी.वाघमारे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२१.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या जागेतील अनधिकृत बांधकामाबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, जि.पुणे यांनी विसंगत दिली. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्यधिकारी, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, जि.पुणे यांनीही आदेशात तसे नमूद केले. अनधिकृत बांधकाम होत असल्याचे नगरपालिकेला कळवूनही योग्य कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता प्रा.मोहन सुखदेव वेताळ यांनी केली.

प्रा.वेताळ यांचा अर्ज अनधिकृत बांधकामावरील कारवाईची मागणी करणारा होता. या मूळ अर्जाच्या काळात चार महिने आपण निलंबित असल्यामुळे कामावर हजर नव्हतो. तथापि माहिती-मागणीच्या अर्जावर विहित मुदतीत त्यांना उत्तर दिले व बांधकाम थांबविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर, शिरूर नगरपरिषद, घोडनदी, जि.पुणे श्री.आर.जी.वाघमारे यांनी केले.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास मूळ संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावी. मात्र अतिक्रमण काढण्याची त्यांची मूळ मागणी प्रशासकीय स्वरूपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**30 APR 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. संजय उमाकांत कदम
रा. वानवडी गाव, १/३३, शिवरकर गार्डनसमोर,
पुणे-४११ ०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
(एकात्मीकृत घटक), सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,
(एकात्मीकृत घटक), सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.४.२०१० |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
(एकात्मीकृत घटक), सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ श्री. अ. व्यं. खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
(एकात्मीकृत घटक), सार्वजनिक बांधकाम विभाग,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१ श्री. एस. ए. बासडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.४.२००८ |

६ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

आयोगाने दि. २०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. संजय उमाकांत कदम यांनी आपल्या वडिलांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या अनुषंगाने माहिती मागितल्याचे नमूद केले होते. परंतू कार्यालयाला तो अर्ज प्राप्त झालेला नव्हता. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी राज्य माहिती आयोगाकडून अर्जाची प्रत प्राप्त करुन घेऊन श्री. कदम यांनी मुद्देनिहाय माहिती पाठविली. नंतरच्या काळात उपलब्ध झालेल्या संबंधित विषयाच्या अतिरिक्त कागदपत्रांच्या प्रतीही पाठविल्या, असे जन माहिती अधिकारी श्री. एस. ए. बासडे / अपिलीय प्राधिकारी श्री. अ. व्यं. खैरे यांनी ५नमूद केले. मूळ विषयातील प्रशासकीय कार्यवाहीसाठी आवश्यक असलेल्या बाबींची कल्पनाही श्री. कदम यांना पत्राद्वारे दिली. तसेच संचिका अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचे त्यांना कळविले, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक, पुणे श्री. अ.व्यं. खैरे यांनी दि. २२.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप घनश्याम भालेराव
१३८, सिध्दार्थनगर, रहाटणी गाव, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ड प्रभाग, स्थापत्य विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ड प्रभाग, स्थापत्य विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.इ.इ.इंगळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.८.२००८ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळीही ते उपस्थित नव्हते.

आपण मागितलेली माहिती निःशुल्क व दिशाभूल करणारी दिली. प्रथम अपिलाची दखल घेतली गेली नाही, असे अपीलकर्ता श्री.दिलीप घनश्याम भालेराव यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात नमूद केले आहे.

अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिली. अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्याकडे अपीलकर्ता यांनी रितसर अपील केले नव्हते. त्यामुळे पुढील कार्यवाहीचा प्रश्न आला नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'लाही ते उपस्थित नव्हते. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संपूर्ण संचिका उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.इ.इ.इंगळे यांनी केले. हे निवेदन लक्षात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जालिंदर रामचंद्र मोरे
निरा, वॉर्ड नं.२, पुरंदर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जालिंदर रामचंद्र मोरे
निरा, वॉर्ड नं.२, पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे डॉ.अरूण जामकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.के.टी.सुकासे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.७.८.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.९.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्याला जन्मजात पोलिओ असल्यामुळे ४३ टक्के प्रमाणाचा अपंगत्व दाखला ससून इस्पितळातून देण्यात आला. मात्र नंतर अपंगत्वात बसत नसल्याचा निष्कर्ष नोंदविला. मूळ दाखल्याप्रमाणे नवा दाखला न दिल्यामुळे आपले नुकसान होत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जालिंदर रामचंद्र मोरे यांनी केली.

अपंगत्वाबाबतचे त्यांच्या मागणीप्रमाणे प्रमाणपत्र देता येत नसल्याचे श्री.मोरे यांना वैद्यकीय तपासणीनंतर कळविले. त्याबाबतची सर्व माहितीही त्यांना देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.के.टी.सुकासे व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे डॉ.अरूण जामकर यांनी श्री.मोरे यांच्या माहिती मिळाल्याची पोहोच असणाऱ्या पत्राच्या छायांकित प्रतीसह केले. प्रमाणपत्राची मागणी अथवा ते देण्याबाबतच्या निर्णयाची योग्यायोग्यता हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**

30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आदिनाथ जगन्नाथ बोंदार्डे
सरस्वती निवास, श्री टाईम लॅब, मार्केट यार्ड शेजारी,
इंदापूर रोड, ता.बारामती, जि.पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.३.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१५.५.२००८ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.आदिनाथ जगन्नाथ बोंदार्डे यांनी मागितलेली माहिती पूर्णपणे दिली आहे. अधीक्षकांच्या तीनपैकी दोन रिक्त जागा, अपुरा कर्मचारीवर्ग, तीन जिल्ह्यांच्या धर्मादाय आयुक्तांच्या आस्थापनेचा आपल्याकडील कार्यभार आदी बाबींमुळे माहिती देण्यास विलंब झाला. अपीलकर्त्यास कार्यालयाकडील माहिती दिली. संस्था स्तरावरील माहिती संस्थेकडून घेण्यास कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चं.आ.पाटील यांनी केले.

विलंबाबाबतचे जन माहिती अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. तथापि विहित मुदतीत माहिती / उत्तर देण्याची समज त्यांना देण्यात येत आहे. संबंधित संस्थेचे विश्वस्त मंडळ बरखास्त करण्याची मागणी अपीलकर्त्यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नोंदविली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेश वसंतराव कांबळे
मु.पो.माळेगाव कॉलनी, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी काया्रलय, शिवाजीनगर,
पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.३.२०१० |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ श्री. आर. जे. भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
श्री. श. ब. दोरगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.८.२००८ |

७ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

हवेली, दौंड, इंदापूर, पुरंदर व बारामती या पाच तालुक्यांमधील नाला बंडिग आदी कामांची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. या कामाची माहिती व मंजुरीचे अधिकार कृषि उपसंचालक कार्यालयाकडे असतानाही त्यांनी माहितीबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांना कळविले. बारामती वगळता अन्य तालुका कृषि अधिकाऱ्यांनी प्रथम अपील दाखल केल्यानंतर अभिलेख अवलोकनासाठी बोलाविले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , पुणे यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही व विविध तालुका कृषी अधिकाऱ्यांनी ७८/- रूपयांपासून २,२९,०००/- रूपयापर्यंतचे शुल्क कळविले. माहिती देण्याची टाळाटाळ करण्याचा हा प्रकार असून त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. राजेश वसंतराव कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात केली आहे.

श्री. कांबळे यांनी सन २००३ ते २००८ या काळातील तीन वर्षांमधील विस्तृत माहिती मागितली होती. व्यापक स्वरुपाची ही माहिती तालुका स्तरावर उपलब्ध होणार असल्यामुळे श्री. कांबळे यांना तसे कळविले. पाचही तालुका कृषि अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत कळविले. त्यांनी कळविलेले शुल्क श्री. कांबळे यांनी भरले नाही, त्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, पुणे श्री. श.ब. दोरगे यांनी केले.

श्री. कांबळे यांनी योग्य अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील न करता आपल्याकडे केले. तरीही सुनावणीच्या दोन तारखा देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत. तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. कांबळे यांच्याशी केलेला पत्रव्यवहार पाहता शुल्क भरुन ते माहिती प्राप्त करुन घेऊ शकतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी , पुणे श्री. आर.जे. भोसले यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा कृषि उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाराव अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे यांनी केलेली कार्यवाही  रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास वामन बनसोडे
मु.पो.आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य वैद्यकिय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास वामन बनसोडे
मु.पो.आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य वैद्यकिय अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे डॉ.नागकुमार कुणचगी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.तानाजी माधवराव जगदाळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.५.३००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.८.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.४.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या मागणीपैकी मुद्दा क्र.२ ची माहिती दिली. मुद्दा क्र.१ बाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कळविले. परंतु त्याचे पुरावे दिले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामदास वामन बनसोडे यांनी केली.

अन्य अपीलकर्त्याने याच माहितीची मागणी केली होती. त्याबाबतचा निर्णय झाला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.तानाजी माधवराव जगदाळे यांनी केले. संबंधित सर्व कागदपत्रे न्यायालयात दाखल केली असल्यामुळे देता आली नाहीत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्य वैद्यकिय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे डॉ.नागकुमार कुणचगी यांनी केले.

प्रकरण केवळ न्यायप्रविष्ट असल्याच्या कारणावरून माहिती नाकारता येणार नाही. संबंधित माहिती आवश्यक तर न्यायालयाकडून प्राप्त करून घेऊन एक आठवड्यात अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. यानुसार माहिती संकलित करण्यात आली असून ती घेऊन जावी, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी अपीलकर्त्यास दि.२१.४.२०१० च्या

पत्रान्वये कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.तानाजी माधवराव जगदाळे यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री उस्मान पिरअहमद कोतवाल
१७७, शनिवार पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सचिव,
हाशमियाँ उर्दू अध्यापिका विद्यालय रामवाडी, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य
हाशमियाँ उर्दू अध्यापिका विद्यालय.रामवाडी, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |
| ३ | उपस्थित<br>**अपीलकर्ता** श्री उस्मान पिरअहमद कोतवाल<br>१७७, शनिवार पेठ,<br>सोलापूर<br>**अपिलीस प्राधिकारी तथा** सचिव,<br>हाशमियाँ उर्दू अध्यापिका विद्यालय रामवाडी, सोलापूर<br>प्रतिनिधी श्री फजल अहमद इरफान शेख<br>**जन माहिती अधिकारी तथा** प्राचार्य<br>हाशमियाँ उर्दू अध्यापिका विद्यालय रामवाडी, सोलापूर<br>प्रतिनिधी श्री फजल अहमद इरफान शेख | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.१.२०१० |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>महाविद्यालयातील सन २००९-१० या शैक्षणिक वर्षातील मेरिट लिस्टच्या छायाप्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री उस्मान पिरअहमद कोतवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलांवर दि. ९.४.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आलेली होती.

सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा सचिव व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य हाशमियॉ उर्दु अद्यापिक विद्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. फजल अहमद इसहाक यांनी सदर कॉलेजला कोणतेही शासन अनुदान मिळत नाही, असे सांगितले. विनाअनुदान शिक्षणसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र ५१३२/२००८ प्रकरणी दिलेला आहे सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 26 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश गबरू पवार
तुळजाभवानीनगर, स.नं.५५/२, दर्गारोड, चंदननगर, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, एकात्मिकृत घटक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४८०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, एकात्मिकृत घटक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे प्रतिनिधी श्री.अ.शं.खैरे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे प्रतिनिधी श्री.एस.ए.बासडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.८.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.१०.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.गणेश गबरू पवार यांनी संपूर्ण उपविभागाची दोन वर्षांच्या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. मूळ अर्जावर मुद्रांक शुल्क नसल्यामुळे तसे कळविले. अपीलकर्त्यांना अभिलेखाचे अवलोकन करू देऊन आवश्यक असलेली माहिती योग्य शुल्क आकारून जन माहिती अधिकारी यांनी द्यावी, असे आदेश अपिलात दिले होते. त्यानंतर श्री.पवार यांनी संपर्क साधला नाही. तसेच संकलित केलेली माहिती व्यक्तिशः ते घेऊन गेले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.एस.ए.बासडे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, एकात्मिकृत घटक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.अ.शं.खैरे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.२६,
(कृष्णा खोरे ), नवीन प्रशासकीय इमारत, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी,
विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.२६,
(कृष्णा खोरे ) यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.२६,
(कृष्णा खोरे ), नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.मुकेश काकडे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.२६,
(कृष्णा खोरे ) यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.एस.आर.सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.४.३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.४.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.कन्हैयालाल मोतीलाल तालेरा यांनी उपस्थित राहता येत नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले.

लोहगाव येथील जमिनीच्या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल असलेल्या दाव्यात विभागीय आयुक्तांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या संदर्भात मागितलेली माहिती न मिळाल्याच्या कारणावरून श्री.तालेरा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. याच जमिनीच्या अनुषंगाने श्री.तालेरा सातत्याने अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. अनेकदा इतरांकडूनही असे पत्रव्यवहार ते करतात. त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले आहे. रूपये २५६०/- शुल्क भरून त्यांनी माहिती घेतली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.२६,(कृष्णा खोरे) यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, पुणे श्री.एस.आर.सोनवणे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

श्री.तालेरा यांच्या अर्जातील अनेक मुद्दे (उदा.मुद्दा क्र.१,२,४,५ ६ इ.) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत बसणारे नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजीव हिंमतराव करडे
गणेशनगर, इंदापूर, मु.पो.ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम पर्यवेक्षक,
नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५११ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.डी.जी.लांघी

**जन माहिती अधिकारी** तथा बांधकाम पर्यवेक्षक,
नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.यु.जी.भोंग

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.८.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.९.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.१.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२०.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा बांधकाम पर्यवेक्षक, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी आपल्या माहिती-मागणी अर्जाबाबत कोणताही पत्रव्यवहार केला नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केली. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी सुनावणी ठेवली, त्या दिवशी आपण सायंकाळी ५.४५ वाजता कार्यालयात गेलो असता कार्यालय बंद असल्याचे आढळून आले. माहिती मिळाली, परंतु विलंबाने दिली. या बाबी लक्षात घेता संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजीव हिंमतराव करडे यांनी राज्य माहिती आयागाकडील अपील अर्जात व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

श्री.करडे यांनी आठ वर्षांच्या काळातील विस्तृत माहिती सरसकट स्वरूपात मागितली होती. माहिती तयार करून विहित मुदतीत त्यांना मोबाईल फोनवरून शुल्क कळविले. शुल्क न भरता त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती देण्यासाठी दोनदा शिपाई पाठविला असता त्यांनी माहिती घेतली नाही. त्यावेळच्या शिपायांनी तसे लेखी निवेदन दिले आहे. माहिती नाकारलेली नाही, उलट अपीलकर्ता यांनी शुल्क भरण्यास व माहिती घेण्यास टाळाटाळ केल्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी त्यांनी ती समक्ष स्वीकारली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा बांधकाम पर्यवेक्षक, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

श्री.यु.जी.भोंग व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.डी.जी.लांघी यांनी केले.

श्री.करडे अपिलाच्या सुनावणीला आले तेव्हा कार्यालय बंद नव्हते. कार्यालयात आले असताना सुनावणीसाठी बोलावले असता न थांबता ते निघून गेले, तसा लेखी जबाब शिपायांनी तेव्हा नोंदविला आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.डी.जी.लांघी यांनी केले. जन माहिती अधिकारी तथा बाधकाम पर्यवेक्षक, मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी शिपायांच्या जबाबासह सर्व संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या.

अपीलकर्त्यांनी आठ वर्षांच्या काळातील 'इंदापूर नगरपालिकेच्या कामासंबंधी सर्व माहिती द्यावी' अशा स्वरूपात सरसकट व विस्तृत माहिती मागितली आहे. अशी मागणी नेमक्या माहितीची नाही. मुद्दा क्र.१,२,३,४,६,७ याच स्वरूपाचे आहेत. अपीलकर्त्यांनी नेमकेपणाने माहिती मागणे आवश्यक आहे, तसे नसल्यास अभिलेख अवलोकनाचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी
गुरूप्रसाद अपार्टमेंट, स.नं.६४/१अ/२/२,
स्वस्तिक गृहरचना सह संस्था, घर नं.१२,
वडगाव बु. त्रिमुर्ती हॉस्पिटलच्या मागे,
धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे-१. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी साप्रवि-१,
सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१२ + २६१६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ३०.३.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)<br>सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री. विजय शंकर मुळीक<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी साप्रवि-१,<br>सोलापूर जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आर. बी. महिंगडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

सेवा सलग धरणे व मानीव दिनांक देणे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आपल्यावर अन्याय केला असून त्याबाबतची योग्य माहिती दिली जात नाही. दिलेली

माहिती अपुरी व विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रभाकर रंगनाथ कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. कुलकर्णी यांचा विषय सन १९६४ पासूनचा असल्यामुळे जुने अभिलेख शोधण्यास विलंब लागला. त्यामुळे प्रारंभी माहिती देता आली नव्हती. प्रथम अपिलानंतर ती दिली. श्री. कुलकर्णी यांनी विचारणा केलेल्या मुद्दयांबाबत अन्य कार्यालयांकडून काही माहिती घ्यावी लागली. तसेच त्यांच्या अर्जातील तपशील लक्षात घेऊन त्यांच्या समकालीन अशा काही कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. अशा प्रकारे सुमारे ४५ वर्षांपासूनची माहिती प्रयत्नपूर्वक श्री. कुलकर्णी यांना दिली. श्री. कुलकर्णी मागणीच्या संदर्भात सातत्याने अर्ज व पत्रव्यवहार करीत असतात. अनेक मुद्दयांमध्ये कारणे, खुलासा याची विचारणा व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी ते करीत असतात. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, साप्रवि-१, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. आर. बी. महिंगडे यांनी केले.

प्रकरण जुने असल्यामुळे शोध घेऊन माहिती द्यावी लागली असल्यामुळे विलंब झाला. तसेच श्री. कुलकर्णी यांची मूळ मागणी विभागीय आयुक्तांनी फेटाळली आहे. पुन:पुन्हा तेच मुद्दे ते उपस्थित करीत असतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र) जिल्हा परिषद, सोलापूर श्री. विजय शंकर मुळीक यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता श्री. कुलकर्णी यांनी उपस्थित केलेले मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत व त्या संदर्भातील उत्तर त्यांना देण्यात आले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

पुणे
दि. 30 APR 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एस.आर.गोयल
अबुशेट रोड, देहूरोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक
जिल्हाधिकारी, पुणे शहर यांचे कार्यालय, फोटो झिंको कार्यालय इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एस.आर.गोयल
अबुशेट रोड, देहूरोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.एस.ओ.नारखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर
यांचे कार्यालय, फोटो झिंको कार्यालय इमारत, पुणे श्री.व्ही.डी.धनशेट्टी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.९.५.३००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.७.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१३.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.१.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.४.२०१० रोजी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांनी विलंबाने उत्तर दिले. आठ दिवसात माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांनी देऊनही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री.महेश आव्हाड यांनी माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.एस.आर.गोयल यांनी केली. जमिनीच्या खरेदीखतासंबंधी विविध अधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या कागदपत्रांची मागणी केली जाते व नागरिकांची अडवणूक होते, म्हणून सर्व नागरिकांना नेमकेपणाने त्याबाबतची माहिती मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

श्री.आव्हाड हे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर होते. त्यांनी माहिती दिली नसल्याचे श्री.गोयल यांचे म्हणणे आहे. पुन्हा त्वरित माहिती देण्यात येईल, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री.व्ही.डी.धनशेट्टी यांनी केले.

श्री.गोयल यांच्या माहिती मागणीच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा व शास्ती का लागू करू नये, याबाबतचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) व

मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांनी आठ दिवसात आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.महेश आव्हाड यांनी दि.२३.४.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. आपल्याकडे सहाय्यक जिल्हा निबंधक, पुणे शहर या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.३.३.२००८ रोजी सोपविण्यात आला होता. नागरी जमीन (कमाल धारणा व नियमन) या निरसित झालेल्या कायद्यांतर्गत येणाऱ्या जमिनीच्या खरेदीखताबाबत नोंदणी करताना वेगवेगळे अधिकारी वेगवेगळ्या कागदपत्रांची सक्ती करतात, अशा स्वरूपाची तक्रार श्री.गोयल यांनी केली होती. सन १९७७ पासून लागू असलेला हा कायदा नुकताच निरसित झालेला असल्यामुळे दुय्यम निबंधकांच्या कार्यपध्दतीमध्ये एकसूत्रीपणा नव्हता, ही वस्तुस्थिती आहे. अडवणूक झाल्याचे नेमके प्रकरण निदर्शनास आणल्यास तत्काळ कडक कारवाई करण्यात येईल, असेही श्री.गोयल यांना लेखी स्वरूपात कळविले होते. तसेच नोंदणीबाबतच्या नियमावलीची प्रतही त्यांना दिली होती. दि.९.५.२००८ च्या अर्जाला दि.६.६.२००८ रोजी उत्तर दिले होते व दि.२०.६.२००८ रोजी माहिती दिली. अतिरिक्त कार्यभार, जुन्या दस्ताबाबतच्या मोठ्या प्रमाणावरील तक्रारी याबरोबरच आजारपणामुळे विलंब झाला, असे श्री.आव्हाड यांनी खुलाशात विस्ताराने नमूद करून विलंब क्षमापित करण्याची विनंती केली आहे. उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता ही विनंती मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड,
पुणे-१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
पुणे शहर, तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ,
पुणे -४११००२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,**
पुणे शहर, तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ,
पुणे -२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२३/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०/०७/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७/०८/२००८ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५/१०/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** आदेश क्र. जमीन-वाटप-एस.आर-३/१९९५ दि.२१/०६/१९९५ या आदेशाच्या संदर्भातील संूपर्ण प्रकरणाचे अवलोकन | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.२९/०१/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्याने अवलोकनास मागणी केलेले प्रकरण

शोध घेऊनही मिळालेले नाही. तथापि अर्जदाराच्या मागणीनुसार जमीन वाटप एस.आर ३/१९९५ च्या आदेशाप्रमाणे फेरफार क्र.३२६६ हा नोंदविण्यात आला असून तो अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिला आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर, श्री.विक्रांत चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुनिलकुमार बावधनकर
c/o चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टन्सीज,
हिरामण लांडे बिल्डींग, कासारवाडी,
मुंबई पुणे रोड, पुणे-३४

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
सहकारी संस्था, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था, (१) पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५३५/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०६/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २/०७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०७/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२/०८/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री. प्रभु विश्वनाथ चोपडे यांच्या दि. १/११/२००१, २२/११/२००१, १६/०१/२००८ व दि. १३/०३/२००८ रोजीच्या अर्जावरील कार्यवाही संदर्भातील कागदपत्रे व अहवाल | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांच्या माहिती-मागणीच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (१) पुणे यांनी दिलेली माहिती दिलेली आहे. तसेच अपिलीय

प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दि. २२/०८/२००८ रोजी दिलेला निर्णय योग्य असून तो कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 APR 2010